स्मार्ट कार्डस् स्वरुपात अनुज्ञप्ती जारी करण्याबाबत मे. युनायटेड टेलिकॉम्स् लि. यांचे सोबत करारातील तरतुदी कार्यपध्दती आणि उभयपक्षी जबाबदाऱ्या.

स्थायी आदेश -१

का.आ.क्र.१४/पआ/संगणक / का -११/१२१-ए/२००५/जाक्र.६४०६ दिनांक ३ मे २००५

भाग १ : प्रकल्पाची माहिती

अ) महाराष्ट्र शासनाने, मोटार वाहने विभागाचे संगणकीकरणासाठी स्वीकारलेल्या आकृतीबंधाप्रमाणे, अनुज्ञप्ती विषयक कामकाज हाताळण्यासाठी तसेच जारी होणाऱ्या अनुज्ञप्ती आकर्षक, टिकावू असाव्या आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन या विषयीच्या अंमलबजावणीचे कामकाज परिणामकारक आणि सुकर व्हावे, या उद्देशाने, केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या शिफारसींप्रमाणे, त्या स्मार्ट कार्डस् स्वरुपात देण्याची ठरविले आहे. त्या निर्णयांचे अनुषंगाने जाहिर निविदा आमंत्रित करुन, हे काम शासन निर्णय क्रमांक एमव्हीए-०२९८/६३४/प्र.क्र.२६/परि-२ दिनांक १५.१.२००३ अन्वये मे. युनायटेड टेलिकॉम्स् लि. बंगलोर या कंपनीस देण्याचे ठरले आहे. **(प्रपत्र अ)**

२. या संदर्भात जारी केलेल्या निविदापत्राप्रमाणे,

अ) स्मार्ट कार्डस् स्वरुपात अनुज्ञप्ती तयार करणे,
ब) त्यासाठी अवश्यक हार्डवेअर पुरविणे,
क) आवश्यक मनुष्यबळ पुरविणे,
ड) कंझ्युमेबल्स् पुरविणे,
इ) सर्व परिवहन कार्यालयांना जोडणारे जाळे (Network)उभारणे,
फ) शिकाऊ अनुज्ञप्ती तयार करणे,
ग) परिवहन विभागाने दिलेल्या जागेत सुधारणा करणे (Site Preparation) व संगणक यंत्रणा उभारणे.

ही कामे मे. युनायटेड टेलिकॉम्स् कंपनीने करणे अपेक्षित आहे. मोटार विभागाने, कंपनीस परिवहन कार्यालयांमध्ये जागा उपलब्ध करुन देणे आणि शुल्काच्या पावत्या व अर्जाचे नमुने यासाठी स्टेशनरी पुरविणे अपेक्षित आहे. ज्या कार्यालयात सदर यंत्रणा बसविण्यासाठी किमान १० फूट X१०फूट इतकी जागा उपलब्ध नसेल अशा कार्यालयांना नजिकची जागा भाडयाने घेवून, कंपनीस उपलब्ध करुन दयावी व अशा जागेचे भाडे कार्यालयाने भरावे. कंपनीने केलेल्या भांडवली गुंतवणुकीची वसुली, कंपनीने पुरविलेल्या सेवांचे बदल्यात म्हणजेच प्रत्येक स्मार्टकार्ड स्वरुपातील अनुज्ञप्तीसाठी आणि प्रत्येक शिकाऊ अनुज्ञप्तीसाठी, उपरोक्त प्रपत्र अ मधील दिनांक १५.१.२००३ चे शासन निर्णयात मान्य केलेल्या दराने, रक्कमेची अदायगी करुन केली जाईल.

स्मार्टकार्ड विषयक माहिती

अ) स्मार्टकार्ड म्हणजे क्रेडिट कार्डाच्या आकाराच्या प्लॅस्टिक कार्डामध्ये बसविलेली इंटिग्रेटेड सर्किट चिप होय. कार्डाचे प्लॅस्टिकवरील भागात डोळ्यांना दिसू शकणारी (Visual Inspection Zone - VIZ) माहिती छापता येते. तर चिपमध्ये इलेक्ट्रॉनिक उपकरणाचे (Hand Held Terminal) सहाय्याने, इलेक्ट्रॉनिक पध्दतीने लिहिलेली माहिती (Machine Readable Zone - MRZ) वाचता येते. या माहितीमध्ये अनुज्ञप्ती धारकाची जुनी माहिती साठविली जाते. त्याचप्रमाणे अनुज्ञप्ती विषयक गुन्हयांची माहितीही साठविता येते. ही माहिती वाचण्यासाठी व त्यात अधिक माहिती साठविण्यासाठी/असलेली माहिती बदलण्यासाठी, यथायोग्य अधिकारीता असणाऱ्या अधिकाऱ्यास उपरोक्त उपकरणाचा उपयोग करता येतो. थोडक्यात, सर्वसाधारण संगणकाच्या सेंट्रल प्रोसेसिंग युनिटचे (CPU) कार्य चिप करते, तर संगणकास माहिती पुरविणारे कि बोर्ड (Input device), संचयित माहिती दर्शविणारे मॉनिटर (Output device) आणि विद्युत पुरवठा करणारी बॅटरी (Power Supply) हे घटक हॅण्डहेल्ड टर्मिनलद्वारा पुरविले जातात व स्मार्टकार्डसह हॅण्डहेल्ड टर्मिनल एका संगणकासमान काम करते. स्मार्टकार्ड मधील माहिती वाचल्यानंतर/अद्ययावत केल्यावर हॅण्डहेल्ड टर्मिनलमध्ये साठविलेली ही माहिती, परिवहन कार्यालयाचे संगणकावर उतरविता येते. या पध्दतीने कार्यालयातील संगणकातील माहिती अद्ययावत होते. तथापि, अनुज्ञप्ती स्मार्टकार्डस् स्वरुपात देताना, ही स्मार्ट कार्डे विविध कंपन्यांकडून पुरविली जाणे, ती वाचण्यासाठी आवश्यक हॅण्डहेल्ड टर्मिनल्सही वेगवेगळ्या उत्पादकांकडून तयार केली जाणे, अपरिहार्य आहे. परंतु, मोटार वाहने अधिनियिम, १९८८ च्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणत्याही राज्यात जारी झालेली, कोणत्याही उत्पादकाने पुरविलेल्या स्मार्टकार्ड स्वरुपातील अनुज्ञप्ती, उर्वरित कोणत्याही राज्यात, कोणत्याही उत्पादकाने पुरविलेल्या हॅण्डहेल्ड टर्मिनलचे आधारे वाचता येणे, अद्ययावत करता येणे आवश्यक आहे. या किमान आवश्यक निकषाला कार्डे आणि हॅण्डहेल्ड टर्मिनल्स यातील परस्परपुरक कार्यक्षमता (interoperability) म्हणतात. केन्द्र शासनाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे सर्व राज्यांवर या किमान निकषांची पुर्तता करणारी कार्यप्रणाली अवलंबिली जाणे अगत्याचे आहे. केन्द्र शासनाने नियुक्त केलेल्या उच्चस्तरीय समितीने कार्डे, टर्मिनल्स इत्यादी विषयी जारी केलेली मानके सोबत जोडली आहेत. **(प्रपत्र ब)**

विभागाने या तंत्रज्ञानाचा अंगिकार करताना " बांधा (Build), मालकी ठेवा (Own), वापरा (Operate), आणि हस्तांतरीत (Transfer) करा " हा आकृतीबंध स्वीकारला आहे. जाहीर निविदांद्वारे निवडलेल्या खाजगी उद्योजकाने, ही प्रणाली राबविण्यासाठी भांडवली आणि आवर्ती स्वरुपाची गुंतवणूक करुन, शिकाऊ अनुज्ञप्ती जारी करणे, त्याचे नुतनीकरण करणे, नवीन पक्की अनुज्ञप्ती जारी करणे, नुतनीकरण करणे, दुसरी प्रत जारी करणे, जुन्या अनुज्ञप्तीवर वाहनाचा नवीन संवर्ग नोंदविणे, नाव बदलणे, पत्ता बदलणे या संदर्भात प्राप्त अर्जांच्या हाताळणीसाठी विहित कार्यपध्दतीतील विविक्षीत जबाबदाऱ्या पार पाडावयाच्या आहेत. मनुष्यबळ पुरविणे, हार्डवेअर पुरविणे, फर्निचर्स पुरविणे या जबाबदाऱ्यांचे, कंत्राटदार कंपनी आणि विभाग यामधील वाटप कोष्टक स्वरुपात सोबत जोडले आहे. **(प्रपत्र क)**

ब)१.) विविक्षीत कार्यालयातील कामाचा बोजा लक्षात घेता, वर परिच्छेद ३ मध्ये नमूद केलेल्या वेळेच्या मर्यादेत कामकाज पार पाडण्यासाठी आवश्यक असणारे हार्डवेअर कंपनीने पुरविणे अपेक्षित आहे. हा कामाचा बोजा दिवसातील सरासरी अर्जाची संख्या यावर अवलंबून नसून त्या दिवसातील कोणत्याही एका तासात हाताळल्या जाणा-या अर्जाच्या महत्तम संख्येवर (Peak load / /hr) अवलंबून असेल. थोडक्यात कंपनीने पुरविण्याचे हार्डवेअरसाठी 'प्रतिदिन' हाताळल्या जाणा-या अर्जाच्या सरासरी संख्येसाठी पुरेसे असा निकष

नसून, 'त्या दिवसातील जास्तीत जास्त गर्दीच्यावेळी हाताळल्या जाणा-या अर्जांच्या [illegible] आहे. कंत्राटाच्या सुरुवातीस आवश्यक अंदाजीत हार्डवेअरचा कार्यालय निहाय तपशील [illegible] मध्ये जोडला आहे. सतत वाढत राहणा-या कामाच्या बोजाचे योग्य मुल्यमापन [illegible] अनुषंगाने आवश्यक तेथे हार्डवेअरमध्ये वाढ करणे शक्य व्हावे म्हणून उपरोक्त "अर्जांचे [illegible] तास "(Peak load) याची दर सहा महिन्यानंतर, मागील सहामाहीतील माहितीच्या आधारे. [illegible] येईल (कलम ९.१)

२. कंत्राटादरम्यान कंपनीने पुरविण्याचे हार्डवेअरही विनाखंड चालू रहावे यासाठी बंधने घालण्यात [illegible] त्याप्रमाणे, कंत्राटातील कलम ९.४ अन्वये हार्डवेअर ९९ टक्के काळ चालू असणे [illegible] त्याचप्रमाणे हार्डवेअरचा विमाही विनाखंड चालू ठेवण्याचे कंपनीवर बंधन घालण्यात आले आहे

३. अनुज्ञप्ती संदर्भात प्राप्त होणाऱ्या अर्जाची आणि त्यासोबत प्राप्त सहपत्राची साठवणूक, [illegible] जागा, योग्य अर्ज शोधण्यासाठी लागणारा वेळ, अनुज्ञप्ती क्रमांक, नाव, अनुज्ञप्ती जारी [illegible] निकषा आधारे विविक्षीत अनुज्ञप्तींचे / व्यक्तिसंबंधीत अभिलेख शोधण्यात येणाऱ्या अडचणी [illegible] म्हणून कंपनीने ' डॉक्यूमेंट मॅनेजमेंट सिस्टीम ' पुरविणे अनिवार्य करण्यात आले आहे [illegible] अर्ज/सहपत्रे यांच्या प्रतिमा इलेक्ट्रॉनिक स्वरुपात साठविणे शक्य होईल व आवश्यकतेप्रमाणे [illegible] क्रमांकावरुन, दिनांकावरुन अभिलेख शोधणे शक्य होईल.

४. या प्रकल्पात कंत्राटदार कंपनीने शिकाऊ अनुज्ञप्तीदेखील तयार करणे अपेक्षित आहे. शिकाऊ अनुज्ञप्तीचे सत्यता पडताळता यावी यासाठी त्यावर विभागाचे बोधचिन्ह असलेला होलोग्राम असणार आहे. त्याचप्रमाणे सदर शिकाऊ अनुज्ञप्ती प्लॅस्टीक लॅमिनेशन करुन दिल्यामुळे ती किमान सहा महिने टिकेल अशी अपेक्षा आहे.

भाग २ : <u>सारथी विषयक माहिती</u>

१. कंत्राटदार कंपनीने त्यांना सोपविलेल्या जबाबदाऱ्या योग्य प्रकारे पार पाडल्या अथवा कसे हे [illegible] ठरविणे शक्य व्हावे यासाठी, कंपनीवर त्यांनी हाताळण्याच्या प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वेळेची [illegible] मर्यादा घालण्यात आली आहे. अशा वेळेच्या मर्यादेत राहून छापलेल्या स्मार्ट कार्डस् साठी [illegible] शासनाने मंजूर केलेल्या दराने रकमेची अदायगी करण्यात येईल. तथापि, जी कार्डे [illegible] वेळेच्या (Turn Around Time) मर्यादेत छापली जाणार नाहीत आणि ज्या विलंबासाठी [illegible] ठरेल, अशा कार्डांच्या बदल्यात केल्या जाणाऱ्या अदायगीवर दंड आकारला जाणार आहे. हे [illegible] रक्कम वाढत्या विलंबाच्या प्रमाणात, ठराविक मर्यादेपर्यंत वाढती असणार आहे. विविक्षित [illegible] अनुज्ञप्तीपैकी, वेळेच्या मर्यादेत छापलेली कार्डे, विलंबाने छापलेली कार्डे, अशा [illegible] झालेला विलंब आणि त्यापोटी आकारण्याच्या दंडाची रक्कम या बाबतीतील अहवाल, ' सारथी ' या सॉफ्टवेअरद्वारा तयार केला जाईल.

२ सदर प्रणालीसाठी वापरण्यात येणारे ' सारथी ' नावाचे सॉफ्टवेअर राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र, यांनी तयार केले असून ते महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाप्रमाणे लायनक्स (Linux) आणि डिबी-२ (db-2) या प्रणालीचा वापर करते. या सॉफ्टवेअरमध्ये महाराष्ट्राचे मोटार वाहने विभागासाठी काही विशेष सुविधा निर्माण केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे . -

(अ) छपाई झालेल्या अनुज्ञप्तीबाबत ' टर्न अराऊंड टाईम ' तपासण्याची [illegible]

(ब) अनुज्ञप्तीसाठी चाचणी दिलेल्या उमेदवारांमधून पुर्नचाचणीसाठी संगणकाद्वारे [illegible] करण्याची सुविधा,

(क) शिकाऊ अनुज्ञप्ती देतेवेळीच पक्क्या अनुज्ञप्तीसाठी चाचणी देण्यासाठी [illegible] वेळ ठरविण्याची सुविधा,

(ड) चाचणीसाठी एकापेक्षा जास्त मोटार वाहन निरीक्षकांमध्ये संगणकाद्वारे [illegible] होण्याची सुविधा.

वरील नमूद सुविधांमुळे अर्जदारास कार्यालयात त्याचे कामासाठी कराव्या लागणाऱ्या [illegible] घट होऊन, अनावश्यक पायऱ्या वगळल्याने प्रक्रिया सुलभ होणे अपेक्षित [illegible] प्रक्रियांमध्ये पारदर्शिता येऊन, विभागाचे कामकाजात विश्वासार्हता येणे अपेक्षित [illegible] पूर्व नियोजित दिवशी / वेळी उपस्थित रहाण्याच्या सुविधेमुळे अर्जदारांना चाचणीसाठी [illegible] ठरविलेल्या दिवशी ठरलेल्या वेळी येणे शक्य होईल त्या पूर्व नियोजित दिवशी [illegible] चाचणीसाठी प्राधान्य देण्यात येईल. किंबहूना, एकापेक्षा जास्त मोटार वाहन निरीक्षकांकडे [illegible] चाचणीसाठी उपलब्ध असणाऱ्या व पूर्वनियोजित वेळेप्रमाणे येणे अपेक्षित असणाऱ्या [illegible] संगणकामार्फतच शक्य असल्याने अशा उमेदवारांठी नियुक्त अधिकारी आधीच [illegible] उमेदवार त्या अधिकाऱ्यांकडे थेट जाऊन चाचणी देऊ शकतील. अशा उमेदवारांचे [illegible] घेऊन संबंधीत अधिकाऱ्यांनी अर्जदाराचे वेळेचा अपव्यय होणार नाही याची [illegible] अपवादात्मक प्रसंगी जेव्हा अशा पूर्व नियुक्त अधिकाऱ्यास काही कारणामुळे [illegible] नाही, त्यावेळी उर्वरित अधिकाऱ्यांमध्ये त्या उमेदवारांचे बाटप केले जाईल. [illegible] दर्शविताना दोन पर्यायी तारखा/वेळा दर्शविण्याची तरतुद करण्यात आली [illegible] अधिकाऱ्यांचे संख्येच्या अनुषंगाने एखादया दिवसासाठी हाताळल्या जाऊ शकणाऱ्या [illegible] उमेदवारांची पसंती दर्शविल्यास, मर्यादेपुढील उमेदवारांच्या दुसऱ्या पसंतीच्या तारखेचा [illegible] विचार केला जाईल.

'सारथी' सॉफ्टवेअर मधील पुर्नचाचणीसाठी उपलब्ध सुविधेप्रमाणे, मोटार वाहन निरीक्षकांनी चाचणी घेतलेल्या उमेदवारांमधून संगणकाद्वारे उमेदवार निवडले जातील. अशा उमेदवारांचे पुर्नचाचणी सहा. प्रापअ / उप प्रापअ घेतील. याव्यतिरिक्त जादा उमेदवारांची पुर्नचाचणी घेण्याचा पर्यायही अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्यांना उपलब्ध असेल. उर्वरित उमेदवारांचे अर्जावर मात्र सहा. प्रापअ / उप प्रापअ. उमेदवाराचे व्यक्तीशः उपस्थितीचा आग्रह न धरता, मोटार वाहन निरीक्षकांचे शिफारसीप्रमाणे आदेश देतील.

भाग ३ : <u>हाताळणी प्रक्रिया</u>

अनुज्ञप्ती संदर्भातील अर्ज हाताळणीच्या प्रक्रियेतील काही टप्पे मात्र मोटार वाहने विभागाच्या कर्मचाऱ्यांनी/ अधिकाऱ्यांनीच पूर्ण करणे आवश्यक आहे. उदा. शुल्क आकारणे, जुन्या अनुज्ञप्ती संदर्भातील माहिती संकलन (data entry), अर्जदाराची चाचणी घेणे आवश्यक वाटल्यास पुनर्चाचणी घेणे, संगणकावर नोंदलेल्या माहितीस मान्यता देणे / अंतिम आदेश देणे इत्यादी तथापि, विभागाने पार पाडण्याच्या प्रक्रियांना लागणारा वेळ प्रामुख्याने उपलब्ध कर्मचारी / अधिकारी यांचे संख्येवर अवलंबून असल्याने, तसेच चाचणीसाठी लागणाऱ्या वेळेवर महत्तम मर्यादा घालणे योग्य नसल्याने, अशा प्रक्रियांसाठी वेळेची मर्यादा

प्रशासकीय निकषांवर ठरविण्यात आली आहे. वरील परि.४ मधील कंपनीवर [illegible] मर्यादेचे बंधन आणि वर नमूद केलेले विभागाने स्वीकारण्याचे प्रशासकीय बंधन [illegible] अर्जांच्या हाताळणीसाठी लागणारा सरासरी वेळ ठरविता येईल. विभागाने या वेळे [illegible] करुन, अर्जदारास अनुज्ञप्ती जारी करणे आवश्यक आहे. अर्जांचे हाताळणीतील [illegible] कोष्टक सोबत जोडले आहे. **(प्रपत्र ड)**

६. उपरोक्त आराखडयात कामांची विभागणी झालेली असून उभयतांनी पार [illegible] एकमेकांच्या कार्यतत्परतेवरही अवलंबून आहेत. उदा. शुल्क वसुलीनंतर (विभागाचे [illegible]) अर्ज माहितीच्या नोंदणीसाठी (कंपनीची जबाबदारी) तातडीने हस्तांतरीत न केल्यास [illegible] परिणामतः उर्वरित प्रक्रियांना विलंब होणे अपरिहार्य आहे. या कारणाने उभयपक्षी [illegible] विनाविलंब होणे अगत्याचे आहे. कंपनीसोबत केलेल्या/प्रस्तावित करारात या बाबतीत [illegible] आहे. त्याप्रमाणे अर्ज हाताळणीच्या प्रक्रियेतील विविक्षीत टप्पा पार पाडण्याची [illegible] पक्षाने, त्या टप्प्यापुढील टप्पा पार पाडण्याची जबाबदारी असणाऱ्या पक्षाकडे [illegible] करण्याची जबाबदारी पार पाडावयाची आहे. उपरोक्त उदाहरणात शुल्क वसुलीनंतर [illegible] माहिती नोंदणीसाठी हस्तांतरीत करण्याची जबाबदारी विभागाची असेल, तर माहिती [illegible] परीक्षा मोटार वाहने निरिक्षक घेणार असल्याने त्यांचेकडे अर्ज पोहोचविण्याची जबाबदारी [illegible]

७. स्मार्ट कार्डस् स्वरुपात अनुज्ञप्ती देण्याचे या प्रकल्पात दोन संस्थांचा (युनायटेड टेलिकॉम्स् लि. [illegible] मोटार वाहन विभाग) सहभाग असल्याने, या संबंधातील कामकाजात सुसुत्रता आणण्याचे [illegible] त्याचबरोबर सर्वसामान्य अर्जदाराच्या दृष्टीने हे कामकाज आटोपशीर किमान गुंतागुंतीचे [illegible] तार्किकदृष्टया सुसंबध्द असणे आवश्यक आहे. अनुज्ञप्ती विषयक कोणत्याही अर्जासंबंधात [illegible] तीन/चार खिडक्यांपेक्षा जास्त खिडक्यांवर जाणे आवश्यक असता कामा नये. या तीन चार खिडक्यांवर / टप्प्यांवर शुल्क आकारणी/ फोटो काढणे/स्वाक्षरी घेणे/चाचणी परीक्षा व अनुज्ञप्ती जारी करणे हे कामे [illegible] पूर्वी जारी केलेल्या अनुज्ञप्तीसंदर्भात नुतनीकरणे/दुसरी प्रत देणे/पत्ता बदलणे/नव बदलणे इत्यादी अर्जासंदर्भात शुल्क आकारणी, संबंधीत अनुज्ञप्ती जारी करणे ही कामे [illegible] उपरोक्त अर्जासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की अर्जदाराने त्यांच्या अनुज्ञप्ती क्रमाकाचा अचुक तपशील पुरविणे ही त्याची जबाबदारी आहे. सबब, केवळ अनुज्ञप्ती क्रमांक पडताळणीसाठी वेगळी खिडकी/फायदा असणे आवश्यक नाही. शुल्क आकारणीनंतर, अभिलेख्यांसोबत पडताळणी करताना, अर्जदाराने नमूद केलेला क्रमांक चूक असल्याचे आढळल्यास ती अर्जदाराची जबाबदारी असेल.

भाग ४ की मॅनेजमेंट सिस्टीम

८. स्मार्ट कार्ड स्वरुपातील अनुज्ञप्तीचे स्वाक्षांकन आणि कि मॅनेजमेंट सिस्टीम (Key Management System- KMS)

सर्वसाधारण अनुज्ञप्तीवर अनुज्ञप्ती प्राधिकरणाच्या स्वाक्षरीचा रबरी शिक्का व कार्यालयाची मोहोर उमटवून स्वाक्षांकन केले जाते. त्याद्वारे त्या अनुज्ञप्तीची सत्यता ध्वनित केली जाते. प्राधिकरणाच्या रबरी शिक्कयाची जबाबदारी विविक्षीत कर्मचाऱ्यांकडे / अधिकाऱ्यांकडे असते. स्वाक्षरीच्या शिक्क्यांचा वापर प्राधिकृत व्यक्तीने केला असल्याचे द्योतक म्हणून, ती व्यक्ती रबरी शिक्कयाच्या मुद्रेखाली स्वतःची स्वाक्षरी करेल.

स्मार्ट कार्ड स्वरुपातील अनुज्ञप्तीच्या चिपवर साठविलेल्या माहितीचे [illegible] त्यासाठी त्या माहितीची सत्यता दर्शविण्याचे उद्देशाने, प्राधिकृत अधिकारी [illegible] सांकेतिक कार्ड पुरविण्यात येतात. त्यांना authorisation keys म्हणतात [illegible] स्वरुपातील अनुज्ञप्तीच्या चिपवर प्राधिकृत अधिकारी, त्यास पुरविण्यात [illegible] वापर करुन तो अनुज्ञप्ती अधिकृत करतो. अशाच पध्दतीने अनुज्ञप्तीचे [illegible] त्यात बदल करण्यास, अनुज्ञप्तीवर गुन्हयांची नोंद घेण्यास प्राधिकृत अधिकारी [illegible] cards असतील. त्यांचा वापर करुनच त्यांना चिपमधील माहिती वाचता/[illegible] स्मार्ट कार्ड स्वरुपातील अनुज्ञप्तीमधील माहिती वाचू/बदलू/अद्ययावत करु [illegible] हेल्ड टर्मिनलचा वापर करेल तेव्हा अनुज्ञप्ती कार्डमधील चिप, अशा व्यक्ती [illegible] कसे हे पडताळेल. तद्वतच, अधिकारी व्यक्तीचे कार्ड, ती अनुज्ञप्ती वैध आहे [illegible] पडताळणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यावरच पुढील कार्यवाही शक्य होईल.

ही authorisation card / endorsement cards रबरी शिक्कयांप्रमाणेच [illegible] आहे. या कार्डाची वैध कालमर्यादा संपल्यावर, त्यांचे नुतनीकरण करणे, कार्ड [illegible] दुसरी key तयार करण्याची पध्दत ते करण्यास प्राधिकृत व्यक्ती इत्यादि [illegible] करण्यात येत आहेत.

भाग ५ :शुल्क वसुली व कंत्राटदारास अदायगीसाठी प्रणाली

कंत्राटदार कंपनीस अदायगी करण्याची पध्दत

मे. युनायटेड टेलिकॉमस् लि. कंपनी सोबत केलेल्या कराराप्रमाणे, अनुज्ञप्ती [illegible] अदायगीसाठी पुढीलप्रमाणे पध्दत अमलात आणली जाईल.

(अ) जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी उप प्रापअ/ प्रापअ यांचे नावे तर मुंबई [illegible] नावे स्वीय प्रपंची खाते **(Personal Ledger Account)** उघडण्यात [illegible] वापराबाबतच्या व खाते उघडण्याबाबतच्या सविस्तर सूचना स्वतंत्रपणे जारी [illegible]

(ब) अनुज्ञप्तीसाठी जमा होणाऱ्या शुल्काची पुढीलप्रमाणे विभागणी केली जाईल.

(१) शिकाऊ अनुज्ञप्ती चे शुल्क रु. ३० प्रति शिकावू अनुज्ञप्ती. [illegible] नुसार कोषागारात जमा केली जाईल.

(२) नमुना ७ मधील पक्क्या अनुज्ञप्तीचे शुल्क रु २००/- [illegible] कार्यालयात, प्रतिअनुज्ञप्ती जमा झालेल्या रु २००/- शुल्कापैकी रु १००/- [illegible] कोषागारात प्रचलित कार्यपध्दतीनुसार जमा केले जातील तर उर्वरित रु १००/- प्रति [illegible] कार्यालयाच्या पी एल अकांऊंट मध्ये जमा केले जातील.

(३) दर महिन्याच्या पाच तारखेपुर्वी, संबधित कार्यालय, विहीत [illegible] परिवहन आयुक्त यांना , मागील महिन्यात जारी केलेल्या एकूण शिकाऊ अनुज्ञप्ती व नमुना ७ मधील पक्क्या अनुज्ञप्तींची संख्या कळवेल. याशिवाय अनुज्ञप्ती जारी करताना विहीत कालावधीपेक्षा जास्त उशीर झालेल्या अनुज्ञप्तींची संख्याही विहीत नमुन्यात परिवहन आयुक्तांना कळवेल. (उशीर झालेल्या अनुज्ञप्तींचा अहवाल [illegible] प्राप्त होईल.)

(४) उपरोक्त अहवालासोबत, संबंधित प्रापअ /उपप्रापअ, प्रती [illegible] त्यांच्या पी एल अकाऊंट मधून काढलेल्या डिमांड ड्राफ्ट [illegible] आयुक्त महाराष्ट्र राज्य यांचेकडे जमा करेल. प्रादेशिक/उप प्रादे[illegible] यांच्या नावाने उघडलेल्या पी एल अकाऊंट मधून अन्य [illegible] प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना असणार नाही.

(५) संपूर्ण राज्यातून जारी केलेल्या शिकावू अनुज्ञप्ती व पक्की अनुज्ञप्ती [illegible] परिवहन आयुक्त, दर महिन्यास मागील महिन्यातील कामाबाबत [illegible] खालीलप्रमाणे देय रक्कम गणन करतील.

शिकावू अनुज्ञप्ती	-	रु. ५.४०	प्रती [illegible]
पक्की अनुज्ञप्ती	-	रु. ८७.३०	प्रती अनु[illegible]

उपरोक्त देय रक्कमेपैकी ९० टक्के रक्कम मे. यूटीएल यांना परिवहन [illegible] पी एल अकाऊंटमधून महिन्याच्या १० तारखेपूर्वी अदा केली जाईल

(६) प्रापअ / उप प्रापअ यांचेकडून उशीर झालेल्या अनुज्ञप्तीचा तपशील [illegible] त्यानुसार मे. युटीएल यांचेकडून वसूल करावयाच्या दंडात्मक रक्कम [illegible] सदर दंडात्मक रक्कम शेष १० टक्के देय रक्कमेतून कपाती करुन, उर्वरीत [illegible] आयुक्त व युटीएल यांना महिन्याच्या अखेर पर्यंत अदा करतील.

(७) उपरोक्त तरतुदी शासननिर्णय क्र. एमव्हीए ०५०३/७३८/प्रक्र ६५/१/ परि. [illegible] एप्रिल २००५ नुसार निर्धारित केल्या असून त्याची प्रत **जोडपत्र (इ)** मध्ये आहे.

तसेच, प्रापअ/उपप्रापअ यांनी त्यांचे कार्यालयात मे.युटीएल यांचेमार्फत जारी [illegible] शिकावू अनुज्ञप्ती व पक्क्या अनुज्ञप्तीची व उशीरा जारी केलेल्या पक्क्या अनुज्ञप्ती [illegible] माहिती देणारे प्रपत्र **जोडपत्र (ई)** मध्ये आहे.

भाग ६ -**संकीर्ण** - सदर आदेश, कार्यालयात बैठक आयोजित करुन सर्व कर्मचाऱ्यांस समजावून [illegible] तसेच भविष्यात संदर्भाकरीता, स्वतंत्र नस्तीमध्ये नस्तीबध्द करावेत.

[illegible] प्रपत्रे अ,ब,क,ड,इ,ई.....

परिवहन आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

मोटार वाहन चालकांची अनुज्ञप्ती स्मार्ट कार्डवर देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन निर्णय क्र. एमव्हीए-०२९८/६३४/प्र.क्र.२६/परि.२
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक :- १५ जानेवारी, २००३

संदर्भ :- १) शासन निर्णय, गृह विभाग, क्र. एमव्हीए-०२९८/६३४/प्र.क्र.२६/परि.२, दिनांक ८.८.२००२
२) शासन पत्र, गृह विभाग, क्र. एमव्हीए-०२९८/६३४/प्र.क्र.२६/परि.२, दिनांक ३०.८.२००२
३) परिवहन आयुक्त यांचे पत्र क्र. पआ/संगणक/का.११/११०-अ/२००२/जा.क्र. १५८२६, दिनांक २५.१०.२००२
४) शासन पत्र, गृह विभाग, क्र. एमव्हीए-०२९८/६३४/प्र.क्र.२६/परि.२, दिनांक ३१.१०.२००२

शासन निर्णय :- मोटार वाहन चालकांची अनुज्ञप्ती स्मार्ट कार्डवर देण्याच्या संदर्भात निविदा मागविण्यास शासन निर्णय, गृह विभाग, क्र. एमव्हीए-०२९८/६३४/प्र.क्र.२६/परि.२, दिनांक ८ ऑगस्ट २००२ अन्वये शासनाची मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार परिवहन आयुक्तांनी याबाबतच्या निविदा मागविल्या होत्या. निविदा प्राप्त झाल्यानंतर याकरिता नियुक्त केलेल्या समितीकडून त्यांची छाननी करण्यात आली. तांत्रिकदृष्टया पात्र ठरलेल्या निविदाधारकांचे आर्थिक देकार उघडल्यानंतर युनायटेड टेलिकॉम लि., बंगलोर या कंपनीचे दर हे सर्वात कमी असल्याचे आढळून आले आहे (Learning Licence Rs. 5.40, Driving Licence Rs. 87.30). त्यामुळे युनायटेड टेलिकॉम लि., बंगलोर या कंपनीची निविदा स्वीकारण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. परिवहन आयुक्तांनी याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Simant DL
15/1/2003

(प्र. कृ. सगदेव)
उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रति,
- परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
- महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र - १, मुंबई
- अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
- निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
- प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (पूर्व / पश्चिम / मध्य), ठाणे, पुणे
- निवडनस्ती

Annexure-G (5)

Procedure for handling applications involving legacy data

(Sections 6.1.5 , 6.1.6)

Applications for following transactions such as issue of duplicate copy of a licence, renewal of a licence, recording an additional class of vehicles in a licences, change of address & name call for processing an application with reference to the legacy data either electronic (in TOOLS) or on paper based records.

(b)Issue of duplicate copy of the driving licence,renewal of the driving licence or change of address and/or name on the driving licence.

Sr. No.	Action by the applicant	Processing of the documents	Responsibility		Output
			MVD	UTL	
1	2	3	4A	4B	5
1	Applicant submits application together with necessary enclosures.	The application is scrutinised for correctness and completeness, MDL number is ascertained.	MVD staff ascertains the MDL number and order . acceptance of fees.	--	--
2	Applicant approaches MVD cashier and pays fees and proceeds towards UTL counter.	Fees are accepted and receipts issued.	MVD staff accesses the manual record and carries out data entry.	UTL captures photo and signature.	Receipt is issued
3	Applicant approaches L/A (ARTO) (if selected for retesting by the system)	ARTO -- reteststhe candidate. -- records results on system.	(1)ARTO (MVD) (2)The correctness of data is verified by MVD staff useing 'preview'option (3) Incorrect records are reverted back to UTL		

4	Applicant approaches delivery counter		(1) MVD staff activates the card using keys	UTL prints Smart Cards.	
5	---	---	MVD --- verifies VIZ data --- Write RTO 1,RTO2 ---Write back card specific data into 'Sarathi' ---- Deliver MDL to applicant.	UTL prints office record.	Office rec[illegible] MDL in a[illegible] of Smart [illegible]

*

[illegible]

[illegible] ११५८

[illegible]

[illegible] आहे अनुसूची [illegible]

[illegible] अनुसूची [illegible]

[illegible] कार्यवाही केली जाते. [illegible]

[illegible]

[illegible] या संबंधातील कार्यपद्धती [illegible]

[illegible] Central Map [illegible] Authority [illegible] राज्य [illegible] State Map Management [illegible] Regional Map [illegible] आवश्यक आहे

[illegible] 99863
[illegible]
[illegible]
वांद्रे (पूर्व), मुंबई [illegible]
दिनांक 9 SEP 2005.

स्थायी आदेश - ३

क्रमांक:पअ/का.११/१२५(अ)/२००५/जा.क.

स्मार्ट कार्ड अनुज्ञप्ती प्रकल्पांतर्गत सेवापुरवठादाराच्या अदा करावयाच्या कार्यपध्दती

१. महाराष्ट्र शासनाने शा. नि. क. एमव्हीए ०५०३/(३३८)/प्रक्र ६५/९/परि-२,दि.१५.४.२००५ नुसार, स्मार्ट कार्ड अनुज्ञप्ती प्रकल्प सेवापुरवठादार मे. युनायटेड टेलिकॉम लि. (यूटीएल) यांना त्यांनी दिलेल्या सवलतीच्या दरांनी आणि कार्यपध्दती शुल्काकरीत अधिसूचना जारी केल्या आहेत. सदर शासन निर्णयाची प्रत जोडपत्र - अ मध्ये आहे.

२. सेवापुरवठादाराबरोबर झालेल्या करारप्रमाणे सेवापुरवठादारास खालीलप्रमाणे रक्कम अदा करावयाची आहे.

प्रति शिकाऊ अनुज्ञप्ती रु. ५.४०
प्रति स्मार्ट कार्ड अनुज्ञप्ती रु. ८७.३०

वरील रक्कम अदा करण्याच्या कार्यपध्दतीबाबत शासनाने दि. २५ जून २५ रोजी शा.नि.क्र.एमव्हीए ०५०३/(३३८)/जा.क्र.६५/परि-२ नुसार शासन निर्णय जारी केला आहे. त्याची प्रत जोडपत्र ब मध्ये आहे.

३. ज्या कार्यालयात सेवापुरवठादार मे. युटीएल त्यांची सेवा देतील त्या प्रत्येक कार्यालयात, मोटार वाहन विभागाच्या रोखपालाकडे सेवापुरवठादाराचा रोखपाल बसेल. ज्या कार्यालयांमध्ये पक्क्या अनुज्ञप्तीसाठी विनंती अर्जांची एकापेक्षा जास्त रोखपाल असतील तर विनंती एकापेक्षा जास्त व एकाच पक्ष ज्या पक्षातील सेवापुरवठादार त्यांचे रोखपाल उपलब्ध करतील.

४. शिकाऊ अनुज्ञप्तीसाठी, उमेदवार रु. ३० चे शुल्क जमा करेल.
परिवहन विभागाचा रोखपाल उमेदवारास विहीत नमुन्यातील [illegible] ची भरणा केल्याची पावती [illegible] जारी करेल. त्यावेळी सेवापुरवठादाराचा रोखपाल [illegible] ५.४० भरणा केल्याची स्वतंत्र पावती उमेदवारास जारी करेल. जमा रक्कम त्यावेळी विभागात [illegible] मोटारवाहन विभागाकडे तर रु. ५.४० सेवापुरवठादाराकडे जमा होतील.

५. पक्क्या स्मार्टकार्ड अनुज्ञप्तीचे बाबतीत, उमेदवार रु. २००/- शुल्क [illegible] करेल. मोटार वाहन विभागाचा रोखपाल भागणीमार्फत रु. ११२.७० ची पावती उमेदवारास जारी करेल. त्यावेळी सेवापुरवठादाराचा रोखपाल उमेदवारास रु. ८७.३० ची स्वतंत्र पावती जारी करेल.
जमा रक्कम त्यावेळी विभागात मोटारवाहन विभागाकडे रु. ११२.७० व सेवापुरवठादाराकडे रु. ८७.३० जमा होतील.

[illegible]

[illegible]

[illegible]

सबंधित : जोडपत्र अ व जोडपत्र ब

[illegible]
सचिव, अन्न व औषध प्रशासन
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १. [illegible] (लोकायुक्त)
२. सर्व आयुक्त व सहायक आयुक्त अधिकारी
३. आयोगाधीन आदेश नस्ती

जा.क्र.12069

परिवहन आयुक्त कार्यालय
प्रशासकीय इमारत, ३रा व ४था मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, सरकारी वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
दिनांक : 23 SEP 2005

परिपत्रक

स्थायी आदेश - ४

विषय - शिकावू अनुज्ञप्तीच्या संगणकीकृत चाचणी प्रणाली च्या स्थापनेबाबत.

(अ) मोटार वाहन विभागाच्या महत्वाच्या कार्यापैकी अनुज्ञप्तीविषयक कामकाज ही एक महत्वाची बाब आहे. प्रत्येक उमेदवारास आवश्यक ती चाचणी घेवून, प्रथम शिकावू अनुज्ञप्ती व त्यानंतर पक्की अनुज्ञप्ती देण्याची तरतूद मोटार वाहन कायदा व तदनुषंगिक नियमांत आहे.

(आ) शिकावू अनुज्ञप्ती जारी करण्यापूर्वी उमदेवारांची चाचणी घेण्याची तरतूद केंद्रिय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ११(१) मध्ये आहे.
उपरोक्त तरतुदींना अभिप्रेत असणारी संगणकीकृत शिकावू अनुज्ञप्ती चाचणी प्रणाली काही संस्थांनी तयार केली असून त्यासंदर्भात शासनाने दि.२ एप्रिल,२००२ च्या पत्र क्र.एमव्हीए ०२०२/६८/प्र.क्र.८/परि.२. नुसार राष्ट्रीय सूचना केंद्राच्या सॉफ्टवेअरशी सांधेजोड करणारी कोणतीही संगणक प्रणाली वापरास्तव प्राधिकृत करण्यात आली आहे.
मे.आरेएन्ट कन्सल्टन्सी या संस्थेने विकसित केलेली व प्राफका नासिक, कोल्हापूर, पुणे येथे कार्यरत असलेली संगणक प्रणाली राष्ट्रीय सूचना केंद्राच्या संगणक प्रणालीशी सांधेजोड करणारी असल्याने ती मान्यताप्राप्त आहे.

(इ) महाराष्ट्र शासनाच्या दि. २१ मार्च, २००२ च्या पत्र एमव्हीए ०२०२/६८/प्र.क्र.८/परि.२ नुसार संगणकीकृत शिकावू अनुज्ञप्ती प्रकल्प उभारण्यास्तव प्रायोजकांची निवड करण्याबाबतच्या अटी निश्चित केल्या आहेत.त्या खालील प्रमाणे आहेत.

१) प्रायोजकत्वाचे करार ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा नसावा
२) प्रायोजकाने अटी / शर्तींचा भंग केल्यास करार रद्द करण्याची तरतूद अंतर्भूत असावी.
३) चाचणी केंद्र/हॉल या ठिकाणी पुरस्कर्त्याचे नाव शासनाच्या नावापेक्षा कमी आकाराचे असावे
४) वितरित होणाऱ्या अनुज्ञप्तींचा डेटाबेसचा उपयोग पुरस्कर्त्यांच्या जाहिराती व्यतिरिक्त अन्य कार्यास्तव केला जात नाही याची संबंधित अधिकाऱ्याने वेळोवेळी खातरजमा करावी.
५) पुरस्कर्त्यांच्या प्रस्तावास मंजुरी देताना, शिकावू अनुज्ञप्ती परीक्षेसंदर्भात पुरस्कर्त्याने छपाई केलेले साहित्य विकत घेणे उमदेवारास बंधनकारक नसावे. मार्गदर्शक साहित्य विनामूल्य वितरण करण्यास हरकत नाही.

शिकाऊ अनुज्ञप्ती चाचणीचे ठिकाणी काही स्थिर/चल जाहिराती पुरस्कर्त्या संस्थेचे वतीने प्रदर्शित करणे प्रस्तावित असल्यास, परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांनी दि.२० मार्च २००३ रोजी पत्र क्र. पआ/का.११/संगणक/एलएलआर ११३/२००२ जा.क्र.३९३१ नुसार जाहिरात छाननी समितीने अशा जाहिराती पाहून त्यास मंजुरी देणे आवश्यक राहील.

सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

१. अपर परिवहन आयुक्त	अध्यक्ष
२. परिवहन उपायुक्त (संगणक)	सदस्य
३. संबंधित कार्यालय प्रमुख	सदस्य सचिव
४. परिवहन आयुक्त कार्यालय, संगणक विभागातील सौ.गीता झयेंकर	सदस्य
५. प्रायोजकांची प्रतिनिधी	निमंत्रक

(उ) शासनाच्या नियोजन विभागाने दि.१७ मार्च २००५ रोजी शासननिर्णय क्र.स्थाविका २००४/प्र.क्र. २४९/कार्या १४४५ नुसार आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत, परिवहन कार्यालयात, संगणकीकृत शिकाऊ अनुज्ञपती चाचणी प्रणालीसाठी अनुदान उपलब्ध करुनदेण्यास मंजूरी दिली आहे. त्यानुसार स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विकास निधीतून अनुदान प्राप्त करुन त्याचेमदतीने सदर सुविधा कार्यालयात सुरु करतायेईल.

असे करतांना, सदर प्रणालीसाठी खालील बाबी प्राप्त करणे गरजेचे राहील.

(१) हार्डवेअर - संगणकीकृत चाचणीसाठी हार्डवेअर खरेदी करतांना खालील बाबी शासनाच्या दरपत्रक करारानुसार किंवा स्थानिक निविदा पध्दतीने खरेदी कराव्यात.

१. विविध प्रकारचे पी.सी. (आवश्यकतेनुसार)
२. यू पी एस
३. उमदेवारांसाठी बसण्याची/उभे राहण्याची व्यवस्था
४. वातानुकूलन यंत्र
५. एल सी डी प्रोजेक्टर

(२) सॉफटवेअर - संगणकीकृत अनुज्ञप्ती प्रणालीसाठी दोन प्रकारचे सॉफ्टवेअर उपयोगात आणले जातात.

(अ) सर्वसाधारण सॉफ्टवेअर - विंडोज व एम एस ऑफीस किंवा अन्य सॉफ्टवेअर आवश्यकतेप्रमाणे सदर सॉफ्टवेअर योग्य त्या परवानगीसह (Licensed Software) खरेदी करावे. सदर सॉफ्टवेअर बाजारात उपलब्ध असून ते स्थानिक विक्रेत्याकडून थेट खरेदी करावे.

(ब) विशिष्ट सॉफ्टवेअर - सदर सॉफ्टवेअर मे.ओरिएन्ट कन्सल्टन्सी किंवा अन्य प्रणाली विकासकाने तयार केलेली असून ती विशिष्ट प्रणाली असल्याने खुल्या बाजारात उपलब्ध होणार नाही. ही प्रणाली विकासकाकडून खरेदी करणे अनिवार्य आहे. अशी खरेदी करताना सदर प्रणाली उपरोक्त (आ) मधील अटींची पूर्तता करते याची खातरजमा करावी. ज्या कार्यालयात राष्ट्रीय सूचना केंद्राची प्रणाली नसेल अथवा मे ओरिएन्ट कन्सल्टन्सी व्यतिरिक्त अन्य प्रणाली विकासकाने विकसन केलेली प्रणाली असेल, तेथे ज्यावेळी

कार्यालयात राष्ट्रीय सूचना केंद्राचे अनुज्ञप्ती विषयक सॉफ्टवेअर स्थापित होईल तेव्हा शिकावू अनुज्ञपती प्रणालीची सांधेजोड विनामूल्य करण्याची तेथी हमी प्रणाली विकासकाकडून घ्यावी. याशिवाय या प्रणालीची माहितीपुस्तके (मॅन्युअल्स) प्राप्त करावीत.

(३) अन्य सामुग्री - संगणकीकृत शिकावू अनुज्ञप्ती प्रकल्पाकरिता अन्य सामुग्री जसे उत्तरे नोंदविणारी उपकरणे, उत्तरे एकत्रित करुन संगणकाकडे पाठवणारे उपकरण (ऑप्टर बॉक्स) आवश्यकत आहे. सदर उपकरणे सर्वसाधारण बाजारात उपलब्ध नसून ती केवळ संगणकीकृत प्रणालीस्तव खास बनविलेली असल्याने त्याचा पुरवठा प्रणाली विकासकासच करावा लागेल.

सोबत उदाहरणादाखल मे.ओरिएन्ट कन्सल्टन्सी यांनी विकसित केलेल्या संगणक चाचणी प्रणाली प्राप्त करण्याचा तपशील दिला आहे.

उपरोक्त मार्गदर्शक तत्वांचे पालन करुन प्रतयेक कार्यालयात संगणकीकृत शिकावू अनुज्ञप्ती चाचणी सुविधा तात्काळ सुरु करावी.

परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई करिता.

प्रत- कार्यवाहीस्तव सर्व प्रापअ/उप प्रापअ

c:pallavi/113/License

क्रमांक:पआ/का.११/संगणक/एलएलआर११३/२००२/जा.क्र. 3639

परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ३ रा व ४ था मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, सरकारा वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दिनांक - १३/०३/२००३

प्रति,
प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय,
मुंबई (मध्य)/कोल्हापूर.

20 MAR 2003

विषय:- समिती स्थापन करण्याबाबत

शिकाऊ अनुज्ञप्ती संगणकीकृत चाचणी प्रदर्शित करावयाच्या जाहिरातींना मान्यता देण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली आहे.समितीमध्ये खालील सदस्यांचा समावेश आहे.

१) सह.परिवहन आयुक्त - अध्यक्ष
२) परिवहन उप आयुक्त संगणक - सदस्य
३) संबधित विभागाचे प्रादेशिक परिवहन अधिकारी - सदस्य सचिव
४) संगणक विभागातील महिला कर्मचारी - सौ. गीता झर्येकर सदस्य
तसेच प्रायोजक संस्थेचे प्रतिनिधी हे आमंत्रीत असतील.

प्रायोजकामार्फत प्रदर्शित करावयाच्या जाहीरातींचा नमुना आपल्या अभिप्रायासह या कार्यालयाकडे हार्ड व सॉफ्ट कॉपीमध्ये प्रत्येक जाहीरातीसाठी प्रस्तावीत केलेल्या वेळेसह सादर करावा.
आपल्या माहीतीसाठी सादर.

उप परिवहन आयुक्त (संगणक)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

परिवहन आयुक्त कार्यालय
नोंदणी क्र. 3931
दिनांक 20 MAR 2003
पाठविल्याचा दिनांक

क्रमांक. एमव्हीए ०२०२/६८/प्र.क्र.८/परि.२,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- २१ मार्च, २००२.

प्रति,

परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

विषय :- शिकाऊ अनुज्ञप्तीसाठी संगणकीय चाचणी सुरु करण्याबाबत.

संदर्भ :- आपले पत्र क्र. पआ/संगणक/का.११/९९/२००१/जा.क्र.१५५६१, दिनांक ११ डिसेंबर, २००१.

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, एन.आय.सी. सॉफ्टवेअरशी सांधेजोड (Integrated) असणाऱ्या कोणत्याही संस्थेस शिकाऊ अनुज्ञप्तीसाठी संगणकीय चाचणी घेण्याबाबतचे कंत्राट पुढील अटींच्या अधिन राहून देण्यास हरकत नसावी.

१) कंपनीशी करण्यात यावयाचा करार ५ वर्षांचा असावा व त्यानंतर तो नुतनीकरण करण्याची तरतुद असावी,
२) उक्त संस्थेने अटी व शर्तींचा भंग केल्यास करार रद्द करण्याची तरतुद असावी,
३) चाचणी केंद्र/हॉल याठिकाणी महाराष्ट्र शासनाच्या नावाच्या तुलनेत पुरस्कर्त्या कंपनीचे नाव कमी आकाराचे असावे,
४) वितरित होणाऱ्या लायसन्सच्या डेटाबेसचा उपयोग कंपनीच्या जाहिराती व्यतिरिक्त अन्य कामासाठी केला जाणार नाही, याची संबंधित प्रा.प.अ. यांनी वेळोवेळी खात्री करुन घ्यावी.
५) WIAA च्या प्रणालीस परवानगी देतांना, त्यांचेकडून छापून वितरित करण्यात येणारी पुस्तिका घेणे बंधनकारक नसावे.

(अनुराधा गोखले)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

अनु क्र (५) प्रमाणे
नवीन संस्था (WIAA देखील)
संपर्क साधावयास सविस्तर प्रस्ताव
कळवण्यासाठी शासनास पत्र
लिहावे.
27/3/2002

GAD:VLHAS K2002VHar-76

प्रस्ताव / का२

Tel. : 26516336
Fax : 26414901

No.DOLETTER/TCOWEBSITE/09/

TRANSPORT COMMISSIONER'S OFFICE
Administrative Building, 3rd & 4th Floor,
Near Dr. Ambedkar Udyan,
Government Colony, Bandra (East)
Mumbai 400 051

Date : 9.3.2009.

CIRCULAR

As you are aware, the image of Motor Vehicles Department is largely dependant on quality of service that is offered to the citizens. Keeping this in mind Transport Commissioner's Office has started its own website wherein citizens now have an access to information regarding functioning of R.T.O's procedures and related information.

Of late I have been receiving various complaints from citizens on the transport grievance cell e-mail and on my personal e-mail too.

Most of the complaints relate to procedure for issue of learner's license, Driving License, transfer of ownership and change of address of vehicles. Keeping this specific requirement in mind certain value added features like online learner's license appointment and form printing, Transfer of Ownership form printing is developed for the benefit of the citizens. The citizen now can enter his personal details on our website and can get an appointment for learner's license test with the respective RTO's/Dy. RTO's office. Correspondingly an auto generated e-mail will be sent to the applicant as well as the licensing authority regarding the application for learner's license.

A facility to print forms for transfer of ownership wherein all the details like name, address, date of sale can be printed on our website. This facility has been started with a view to make form filling easier for citizens. I expect all R.T.Os and Dy.R.T.Os to use the said facility so that you can educate citizens to use this facility. This will help in bringing transparancy in our department working. All our officers should be asked to acquaint with these features so that use of this facility is popularized amongst citizens.

As a part of e-Governance, we have provided for e-mail IDs to all our RTO's /Dy.RTO's which is defined by the registration code assigned to the concerned RTO s/Dy.RTO's for e.g. R.T.O. Mumbai (Central) is assigned e-mail ID MH01@mahatranscom.in for RTO Mumbai (West) the e-mail ID is MH02@mahatranscom.in similarly e-mail ID upto MH45@mahatranscom.in have been created. To start with all RTO/Dy.RTOs. will be having password rto 123, which they have to change once they open their mails.

Once the applicant submits the form for appointment of learner's license, the respective RTO's/Dy.RTO's will get a e-mail regarding appointment by the applicant.

I expect all RTO's and Dy.RTO's to check their e-mails regularly and ensure that those applicants who have applied for learner's license are properly attended in the office.

I also want all RTO's and Dy.RTOs to personally monitor this activity and should appoint a responsible officer who will keep track of such application and ensure that no complaints in this regards are received.

Consider this as most urgent

(Deepak Kapoor)
Transport Commissioner, M.S.

All R.T.O's

All Dy.R.T.O's

विषय- परिवहन विभागांतर्गत, माहितीचे
अदान प्रदान इ. मेलद्वारे करण्याबाबत

परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,
प्रशासकीय भवन, ३रा व ४ था मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत,
बांद्रा, मुंबई ४००० ०५१.

परिपत्रक क्र. ०१/संगणक /ई-मेल /२००९ - जा.क्र.८६८४, दि.४ ऑगस्ट २००९.

परिपत्रक

१. परिवहन विभागाचे मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालये यामध्ये मोठया प्रमाणावर माहितीचे अदान प्रदान चालू असते. अनेकवेळा महत्वाचे अहवाल, आयुक्तालयात वेळेवर प्राप्त होत नाहीत, तर, कराच्या दरामधील वाढ, विशेष तपासणी मोहिमेच्या सूचना इत्यादी माहिती मुख्यालयातून सर्व कार्यालयांना तातडीने पोहचविणे आवश्यक असते.

२. माहितीच्या अदानप्रदानसाठी सर्व कार्यालयांनी इ-मेल चा अधिकाअधिक वापर करावा याकरिता परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून यापूर्वी सविस्तर सूचना जारी झाल्या आहेत. त्यानुसार विविध कार्यालयांनी, माहितीच्या अदान प्रदानाकरिता इ-मेल स्थापन केल्या असून, त्या आधारे काही माहिती व अहवालांचे अदान प्रदान केले जाते.

३. सदर अदान प्रदानाकरिता काही क्षेत्रिय कार्यालयांनी प्राप्त केलेले ई-मेल पत्ते खाजगी स्वरुपाचे आहेत, याशिवाय मुख्यालयाकडे माहिती पाठविण्याकरिता फक्त ई-मेल पत्ता (tcmaharashtra@yahoo.com.) उपलब्ध होता, ज्यामुळे ई-मेल अदान प्रदानात अडथळे येऊन आवश्यक ती माहिती अचुकपणे संबंधित विभागाकडे पोहोचत नसल्याने कार्यालयीन कामकाजात अपेक्षित वेग येत नसल्याचे आढळून आले आहे.

४.१ या अडचणींवर उपाययोजना करण्याचे दृष्टीकोनातून, परिवहन आयुक्त, कार्यालयातील सर्व अधिका-यांना स्वतंत्र ई-मेल पत्ते तयार करण्यात आले असून सर्व क्षेत्रिय कार्यालयांनाही स्वतंत्र ई-मेल पत्ते तयार करण्यात आले आहेत.

४.२ या नवीन पत्यांचे आधारे, क्षेत्रिय कार्यालये, त्यांचे विविध अहवाल व माहिती आयुक्तालयातील विशिष्ट नियंत्रक अधिका-यास थेट पाठवू शकतील, तसेच आयुक्तालयातील विशिष्ट अधिकारी, एखाद्या क्षेत्रिय कार्यालयाशी ई-मेलद्वारे थेट संपर्क साधून माहितीचे अदानप्रदान करु शकेल.

४.३ याशिवाय, जे उमेदवार , त्यांच्या शिकाऊ अनुज्ञप्ती अर्ज अथवा अन्य कामाकरिता वेबसाईटवरुन अर्ज दाखल करतील त्या प्रत्येक अर्जाची पूर्वसूचना ई-मेलद्वारे त्या त्या कार्यालयास मिळत राहील, ज्यायोगे प्रत्येक कार्यालयास, दरदिवशी वेबसाईटवरुन अर्ज दाखल केलेल्या अर्जदारांचा तपशील प्राप्त होईल ज्यायोगे अशा अर्जदारांना तत्काळ सेवा प्रदान करण्यास्तव आवश्यक उपाययोजना संबंधित कार्यालय प्रमुखास करता येतील.

४.४ प्रत्येक कार्यालयाच्या ई-मेल पत्यावर, जनता त्यांच्या तक्रारी नोंदवते, ज्या कार्यालय प्रमुखांना थेट पोहोचतील व अशा तक्रारींचा प्रभावी निपटारा करणे सोईचे होईल.

४.५ सदर सुविधेचा वापर करुन व्हीडीओ संपर्क स्थापन करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे. सदर कार्य पूर्ण झाल्यावर,कोणत्याही कार्यालयाचा,अन्य कोणत्याही कार्यालयाशी अथवा आयुक्तालयातील अधिका-याशी व्हीडीओ संपर्क स्थापित करणे शक्य होईल. याबाबतच्या सूचना स्वतंत्रपणे जारी करण्यात येतील.

५. सदर योजनेअंतर्गत, नव्याने तयार केलेले ई-मेल पत्ते,त्याचा गुप्तशब्द (Password) व वापराची पध्दती याचा तपशील सोबतच्या जोडपत्रामध्ये जोडला आहे.

सदर माहितीचा सर्व कार्यालयांनी तत्काळ वापर सुरु करणे अनिवार्य असून यापूर्वी वापरात असलेले ई-मेल पत्ते वापरणे बंद करणे अभिप्रेत आहे.

सबब, सर्व कार्यालयांनी त्यांचे अहवाल, नवीन ई-मेल पत्याचा वापर करुन परिवहन आयुक्तालयातील विविक्षित नियंत्रक अधिका-यास थेट पाठवावे व असे अहवाल जुन्या ई-मेल पत्यावर (tcmaharashtra@ yahoo.com.) पाठविणे तत्काळ थांबवावे असे आदेशित करण्यात येत आहे.

६. मा. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मंजूरीने.

परिवहन उप आयुक्त (संगणक),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

E/Email/Paripatrak

परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,
प्रशासकीय भवन, ३रा व ४ था मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत,
बांद्रा, मुंबई ४००० ०५१.

परिपत्रक क्र. ०३/संगणक /ई-मेल /२००९ - जा.क्र. १०३२३, दि.१६ सप्टे. २००९
संदर्भ -परिपत्रक क्र. ०१/संगणक /ई-मेल /२००९ - जा.क्र.८६८४, दि.४ ऑगस्ट २००९.

परिपत्रक

या कार्यालयाच्या परिपत्रक क्र. ०१/संगणक /ई-मेल /२००९ - जा.क्र.८६८४, दि.४ ऑगस्ट २००९ कृपया पहावे. सदर विषयांतर्गत खालीलप्रमाणे फेरबदलांची सर्वांनी नोंद घ्यावी.

Sr No	Designation	Username	Password
1	DyTransport Commissioner (Admin)	dycommr.admin@gmail.com	rto12345
2	MV Prosecutor ,Transport Commissioner Office	lawofficer.tco@gmail.com	rto12345
3	ONM,Transport Commissioner Office	organisationofficer.tco@gmail.com	rto12345

सर्व कार्यालयांनी याची नोंद घेवून इ-मेल माहिती अदान-प्रदान करावे.

परिवहन उप आयुक्त (संगणक)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत- १. परिवहन आयुक्त कार्यालयातील सर्व अधिकारी
२. सर्व कार्यालय प्रमुख
३. कार्यासन आदेश नस्ती

E/Email/Paripatrak

विषय- परिवहन विभागांतर्गत, माहितीचे अदान प्रदान इ. मेलद्वारे करण्याबाबत

परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,
प्रशासकीय भवन, ३रा व ४ था मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत,
बांद्रा, मुंबई ४००० ०५१.

परिपत्रक क्र. ०२/संगणक /ई-मेल /२००९ - जा.क्र. , दि. ५ ऑगस्ट २००९.
संदर्भ क्र.१. परिपत्रक क्र. ०१/संगणक /ई-मेल /२००९ - जा.क्र.८६८४, दि.४ ऑगस्ट २००९.

परिपत्रक

१. परिवहन विभागाचे मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालय यांच्यासाठी स्वतंत्र ई-मेल पत्ते तयार करण्यात आलेले असून यापुढे माहितीचे अदान प्रदान प्रत्येक कार्यालयांनी त्यांना देण्यात आलेले ई-मेल वरुन करण्याच्या सूचना संदर्भ क्र. १ च्या परिपत्रकानुसार देण्यात आलेल्या आहेत.

२. परिवहन विभागामार्फत देण्यात आलेल्या ई - मेल हे जी- मेलवर असून यामध्ये वेब कॉन्फरन्सिग करण्याची सोय उपलब्ध असून यापुढे प्रत्येक कार्यालय प्रमुखानी सदर सुविधेचा वापर करुन मुख्यालय अथवा इतर कार्यालय यांच्याबरोबर व्हिडीओद्वारे संपर्क साधणे शक्य होणार आहे. यास्तव सर्व कार्यालय प्रमुखानी त्यांच्या कार्यालयासाठी सुयोग्य वेब कॅमेरा (1.2 Mega Pixel किंवा त्यावरील) व माईकसह उपलब्ध असणारे हेडफोन खरेदी करुन उपरोक्त उपकरण कार्यालयाच्या संगणकांवर दिनांक १०.८.२००९ पर्यन्त कार्यान्वित करावी.

३. वित्तीय अधिकार नियमावलीचा भाग पहिला, उप विभाग दोन, अनुक्रमांक २८अ, नियम क्रमांक ७६ नुसार कार्यालय प्रमुखांना प्रधान केलेल्या वित्तिय शक्तीचा वापर करुन व विहित कार्यपध्दतीचा वापर करुन सदर उपकरणे खरेदी करावी व त्याचा खर्च मंजूर कार्यालयीन खर्चातून भागविण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर यंत्रणा खरेदी करण्यास सरासरी रुपये १५००/- ते २०००/- चा खर्च अपेक्षित आहे.

५. सदर उपकरणे बसविल्यानंतर विविध कार्यालयांशी कशाप्रकारे व्हिडीओ संपर्क साधता येईल याबाबतची सविस्तर कार्यपध्दती सर्व कार्यालयांना ई-मेलद्वारे पाठविण्यात आलेली आहे. त्याचा वापर करुन व्हिडीओ संपर्क स्थापित करावा व त्याचा दैनंदिन कामकाजात अधिका-अधिक वापर होईल यांची काळजी घ्यावी.

६. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत ई-मेलद्वारे उप परिवहन आयुक्त (संगणक) यांच्याकडे पाठवावा.

७. मा. परिवहन आयुक्त यांच्या मान्यतेने.

परिवहन उप आयुक्त (संगणक),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

E:/E-mail/paripatrak